श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी
महिला विद्यापीठ, मुंबई.

ॲफी.जन.१/परिपत्रक/२०१४-१५/ 987 ऑक्टोबर १३, २०१४

**परिपत्रक**

**मा. महोदय/महोदया,**

एस्. एन्. डी. टी. महिला विद्यापीठाचे संचलित व संलग्नित असलेल्या महाराष्ट्रातील सर्व अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालयांना कळविण्यात येते की, **राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये स्त्री–पुरूष समानतेची बीजे रूजविण्यासाठी "जागर जाणीवांचा" अभियांनातंर्गत पारितोषिक देण्याचा उपक्रम शासनातर्फे आहे**. तरी आपण सोबतच्या शासन पत्र क्रमांक संकीर्ण २०१२/प्र.क्र. २९६/१२/विशि–१ दि. २३ ऑक्टोबर, २०१२ याचे अवलोकन करून त्यात नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

(डॉ. मधुरा केसरकर)
संचालक
महाविद्यालय आणि विद्यापीठ विकास मंडळ

**सोबत :** शासनाचे पत्र

**प्रति,**
**मा. प्राचार्य/प्राचार्या,**
एस्. एन्. डी. टी. महिला विद्यापीठाचे संचलित व संलग्नित
असलेल्या सर्व अनुदानित व कायम विना अनुदानित महाविद्यालये
**(महाराष्ट्र राज्य फक्त)**

S.N.D.T.W. UNIVERSITY
MUMBAI-20.
9 NOV 2012
Personnal( )Comm.( )Exam( )
F.O.( )Grants( )Phd.Div.( )
Store( )Lib.( )

राज्यातील महाविद्यालये व शैक्षणिक संस्थामध्ये स्त्री-पुरुष समानतेची बीजे रुजविण्यासाठी "जागर जाणीवांचा" अभियांनातर्गत पारितोषिक ......

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक संकिर्ण २०१२/प्र.क्र. २९६/१२ /विशि-१**
**मंत्रालय, मुंबई -३२.**
**दिनांक : २३ ऑक्टोबर,२०१२.**

**प्रस्तावाना :** प्रत्येक नागरिकाने आत्मसन्मान, आत्मविश्वास आणि निर्भयतेने स्वत:च्या व्यक्तीमत्त्वाचा विकास करणे, देशाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. शिक्षणाचे हेच खरे उद्दिष्ट आहे. आजच्या सामाजिक वातावरणात स्त्रिया व मुलींना अशा प्रकारची संधी पुरेशा प्रमाणात उपलब्ध होत नाही. ही वस्तुस्थिती आहे. ही परिस्थिती बदलून स्त्रिया व मुलींना संपूर्ण आत्मविश्वासाने जगण्याची संधी मिळेल त्याचवेळी आपला देश ख-या अर्थाने सुसंस्कृत व सुशिक्षित मानला जाईल आणि जगभरात एक पुरोगामी राष्ट्र म्हणून ओळखला जाईल. असे वातावरण निर्माण करण्याचे आणि सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याचे महत्त्वाचे माध्यम म्हणजे उच्च शिक्षण आणि ते पुरविणा-या संस्था हे आहेत.

देशाच्या व राज्याच्या सुरक्षित व उज्वल भविष्यासाठी त्या देशाच्या पुढील पिढीचा सर्वांगिण विकास होणे अत्यावश्यक आहे आणि त्यासाठी पोषक व उपयुक्त वातावरण निर्माण करणे, ही शासनाची जबाबदारी आहे. समाजाचा ५० टक्के भाग हा महिला व मुलींनी व्यापालेला आहे. दुदैवाने हा घटक समाजामध्ये समानता व समान अधिकारांपासून वंचित आहे. महाराष्ट्र हे ऐतिहासिक काळापासून महिलांना समानतेची वागणुक देणे व त्यांना शिक्षणाची समान संधी उपलब्ध करुन देण्यामध्ये अग्रेसर आहे. स्वातंत्र्यानंतर राज्य शासनाने या दिशेने ब-याच प्रमाणात ठोस पावले उचलेली आहेत. विशेषत: मुलींच्या उच्च शिक्षणासाठी विविध उप्रक्रम राबविलेले आहेत.

शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, अशी ठोस पावले उचलून सुध्दा मुली अपेक्षित संख्येने उच्च शिक्षणाचा लाभ घेत नाहीत. परिणामी त्या सामाजिक व आर्थिक विकास जे प्रत्येक नागरीकाचे मुलभूत अधिकार आहेत, त्यापासून वंचित राहत आहेत.

मुलींच्या व त्यांच्या पालकांच्या उच्च शिक्षणाच्या अनिच्छेचे प्रमुख कारण म्हणजे शैक्षणिक संस्थांमध्ये स्त्रीयांना आवश्यक त्या सुरक्षित वातावरणाचा आभाव , स्त्री पुरुष

Affili... / BCUD
2357
Date 19/11/12
File



Mr-Nandha, pl. prepare circular
Mhh 16/11/12
Dir, BCUD
19-11-12